# शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांचे कार्यालय पुणे -१

१७ डॉ. आंबेडकर रोड, लाल देवळाजवळ पुणे-१

दुरध्वनी क्रमांक ०२०- २६१२२२१७ फॅक्स क- ०२०- २६१२२२१७

ई-मेल आयडी-11thonlineadmissiondydpune@gmail.com वेब साईट- WWW.dydepune.com


महत्त्वाचे

**जा.क्र.शिउसं/उमाशि-४०३/११ वी/पुवि/१७**

दिनांक :- **२८.०६.२०१७**

**प्रति,**

**सर्व प्राचार्य, उपप्राचार्य,**
**(माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळा), पुणे व पिंपरी चिंचवड मनपा क्षेत्र**

विषय :- **इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सन २०१७-१८ मधील कोटा प्रवेश वेळापत्रक बदलाबाबत**

**संदर्भ:-१) शासन निर्णय क्रमांक न्यायाप्र-२०१५/(६१/१५)एसडी-२ दि.२८.०३.२०१६**
**२) शासन निर्णय क्रमांक प्रवेश-२०१६/(१८०/१६)एसडी-२ दि.०७.१.२०१७.**
**३) या कार्यालयाचे प्रसिध्दी निवेदन दि. १५.०६.२०१७.**
**४) शासन पत्र दिनांक २७.०६.२०१७**

उपरोक्त विषयानुसार सूचित करण्यात येते की, **इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २०१७-१८ चे कामकाज पुणे व पिंपरी चिंचवड, या महानगरपालिका क्षेत्रात शासन निर्णय दि. ०७.०१.२०१७ अन्वये सुरु करण्यात आलेले आहे. यापुर्वी या कार्यालयाचे प्रसिध्दी निवेदन दि.१५.०६.२०१७ नुसार सर्व कोटा प्रवेश हे दि.२८.०६.२०१७ पासून करण्याबाबत सूचित करण्यात आलेले होते. तथापि संदर्भ क्र-४ च्या पत्रानुसार विद्यार्थ्यांनी ऑनलाईन प्रवेश अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक २७ जून २०१७ ऐवजी २९ जून २०१७ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत अशी मुदतवाढ दिल्यामुळे यापुर्वी जाहीर केलेल्या वेळापत्रकात अंशतः बदल करण्यात येत आहे.**

**त्यानुषंगाने आपणांस सूचित करण्यात येत आहे की, दि. २८.०६.२०१७ रोजी सर्व कोटा प्रवेशाची यादी जाहीर करु नये. सर्व कोटयातील प्रवेश प्रक्रिया दि. ३०.०६.२०१७ पासन सुरु होणार आहे, याबाबत पुढील सुधारित वेळापत्रक लवकरच जाहीर केले जाईल याची नोंद घ्यावी.**

सदरचे परिपत्रक या कार्यालयाच्या **www.dydepune.com** व इ.११वी ऑनलाईन प्रवेशाच्या **http://pune.11thadmission.net** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(मिनाक्षी राऊत)
सदस्य सचिव
इ.११ वी केंद्रीय प्रवेश नियंत्रण समिती
तथा
सहा.शिक्षण संचालक
पुणे विभाग पुणे-१

**प्रत माहितीसाठी सविनय सादर :-**

१) मा. आयुक्त(शिक्षण) म.रा. पुणे
२) मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) म.रा.पुणे